# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक

सर्व संबंधितांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, भारताच्या ७५ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शुक्रवार, दिनांक २६ जानेवारी, २०२४ रोजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील प्रांगणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला असून याबाबत परिपत्रक क्र. १६/२०२४, जा.क्र.जस/११/३१, दिनांक २३ जानेवारी, २०२४ अन्वये कार्यक्रमाचा तपशिल प्रसिध्द केलेला आहे. प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाचे राष्ट्रीय महत्त्व लक्षात घेऊन व कर्तव्याचा भाग म्हणून विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी/सेवक, विद्यार्थी आणि विद्यापीठ परिसरातील निवासी या सर्वांनी कार्यक्रमास अगत्याने उपस्थित रहावे.

विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांनी आपल्या उपस्थितीबाबत आपापल्या विभागामध्ये बायोमॅट्रिक प्रणालीव्दारे उपस्थितीची नोंद नोंदवावी. तसेच ज्या शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमास उपस्थित राहणे शक्य नसल्यास व ते इतर ठिकाणी ध्वजारोहणास उपस्थित राहिल्यास तसे उपस्थिती प्रमाणपत्र विभागप्रमुखामार्फत प्रशासन शिक्षकेतर कक्षास सादर करावे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

२४/०१/२०२४

**( प्रा.(डॉ.) विजय खरे )**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 469
दिनांक : 24 JAN 2024

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/ सेवक तसेच विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.